वि.दि.क्रं.१३/२०१८

विजया वि. भागवत

<u>नि.क्रं. १०४ खाली आदेश</u>

वादीने अर्ज देऊन नमूद केले की, दावा प्रलंबीत असताना प्र.वादी क्रं. १ ते ३ यांनी प्र.वादी क्रं.५ ते ७ यांच्याशी संगनमत करुन दावामिळकत असलेली रक्कम वादींच्या परस्पर उचलली आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती आवश्यक आहे. सबब, तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली. सोबत नि.क्रं.१०५ लगत शपथपत्र दाखल केले

सदरचा अर्ज दि.१३/११/२०२५ रोजी दाखल केला. त्यानंतर प्रतिवादीने दि.२१/११/२०२५ व ०३/१२/२०२५ रोजी अर्ज देऊन या अर्जावर म्हणणे देण्यास मुदत मागितली. आज रोजीसुध्दा प्रतिवादींना पुकारले असता ते गैरहजर आहेत. या अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्ज विना म्हणणे चालण्याचा आदेश झाला.

या कामी नुकसानभरपाईत आपला हिस्सा मिळावा म्हणून हा दावा दाखल आहे. ती रक्कम जर प्रतिवादीनी संबंधीत विभागाकडून दावा चालू असताना काढून घेतली तर त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती आवश्यक आहे. दि.१३/०७/२०२१ रोजी ती रक्कम काढून घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी नमूद केले आहे. सबब, दाव्या दरम्यानची ही घटना असल्याने सदर अर्ज मंजूर करण्यात येतो. वादींनी तातडीने दाव्यात दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्यात लगेच दुरुस्त दावाप्रत दयावी.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

**दिनांक: ११/१२/२०२५.** दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.